दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118
●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२६४ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शुक्रवार, ८ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## कोस्टल रोड परिसरात जागतिक दर्जाचे पार्क उभे करणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**■मुंबई,यश सावंत :** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज मुंबई सागरी रस्ता म्हणजेच मुंबई कोस्टल रोडच्या परिसरात ३२० एकर जागतिक दर्जाचे पार्क उभे केले जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे सांगितले. सागरी किनारा रस्त्यासह मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी वरळी, दादर परिसरातील सिमेंट रस्त्यांच्या कामांची पाहणी केली. पावसाळ्यापूर्वी ही सर्व कामे वेळेत पूर्ण व्हावीत, असे निर्देशही त्यांनी मुंबई महापालिका आणि संबंधित यंत्रणाना दिले. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज मुंबई सागरी रस्ता म्हणजेच मुंबई कोस्टल रोडची पाहणी केली. त्यासाठी त्यांनी वरळी ते मरीन ड्राईव्ह असा प्रवास केला. या भेटीत त्यांनी



प्रगतीपथावर असलेल्या कामाची पाहणी करून अधिकाऱ्यांना सूचनाही केल्या. याप्रसंगी मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्यासमवेत मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई मनपाचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. आय. एस. चहल, अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे उपस्थित होते. मुंबई महानगरपालिकेच्या वतीने तयार होत असलेल्या या कोस्टल रोडचे काम वेगाने पूर्ण होत आहे. या कोस्टल रोडवर ३२० एकर जागेत भव्य असे सेंट्रल पार्क उभारण्यात येणार असून, २०० एकर जागेत वेगवेगळी झाडे लावण्यात येणार आहेत. जागतिक दर्जाचे हे पार्क उभारण्यात येणार असल्याचे. तसेच लवकरच हा कोस्टल रोड नागरिकांच्या सेवेत दाखल होईल, असे मुख्यमंत्र्यांनी माध्यम प्रतिनिधींना सांगितले. त्यानंतर मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी वरळी परिसरातील गणपतराव कदम मार्ग, नेहरू सायन्स पार्क येथील सेठ मोतीलाल सांघी मार्ग आणि दादर येथील दादासाहेब रेगे मार्ग याठिकाणी सुरू असलेल्या रस्ता काँक्रीटीकरण कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्थानिक नागरिकांशीही संवाद साधला. ही सर्व कामे वेळेवर आणि दर्जेदार व्हावीत याकडे लक्ष द्यावे. नागरिकांची गैरसोय होऊ नये याची काळजी घेण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. रस्ते काँक्रिटीकरणामुळे मुंबईतील रस्ते खड्डे मुक्त होतील. पावसाळ्यातील पाणी शोष खड्ड्यांद्वारे जमिनीत पुरवण्यासाठी या काँक्रिटीकरण कामांमध्ये शोषखड्ड्यांचा देखील समावेश केला असल्याने ही कामे पर्यावरण पूरक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना नमूद केले.

## डोंबिवलीतील ५० कोटींच्या टीडीआर घोटाळ्याची पुढील आठवड्यात हायकोर्टात सुनावणी

**■कल्याण, रोहित जैसवाल :** डोंबिवलीत गेल्या दहा वर्षांपूर्वी घडलेल्या मौजे शिवाजीनगर भूक्षेत्रावरील ५० कोटींच्या विकास हक्क हस्तांतरण घोटाळ्याचा अहवाल तयार करण्याचे काम डोंबिवलीतील विष्णुनगर पोलिसांनी सुरू केले आहे. येत्या आठवड्यात पोलिसांना या घोटाळ्यासंदभार्तील समग्र अहवाल मुंबई उच्च न्यायालयाला सादर करायचा आहे. या घोटाळ्याचा यापूर्वी तपास करणाऱ्या विष्णुनगर पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांची बदली झाली आहे. त्यामुळे विष्णुनगर पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी कल्याण डोंबिवली पालिकेच्या मुख्यालयात जाऊन नगररचना विभागाच्या साहाय्यक संचालक दिशा सावंत यांची भेट घेतली. त्यांच्याकडून डोंबिवली पश्चिमेतील मौजे शिवाजीनगर हद्दीत (चौपाटी आरक्षण) झालेल्या विकास हक्क हस्तांतरण घोटाळ्याची माहिती घेतली. मागील दहा वर्षांपूर्वी या घोटाळ्या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



करण्यात आला आहे. हे प्रकरण आता न्यायालयात आहे. हे प्रकरण येत्या आठवड्यात सुनावणीला येणार आहे. त्यामुळे या प्रकरणाचा सविस्तर अहवाल विष्णुनगर पोलिसांना उच्च न्यायालयात दाखल करायचा असल्याने पोलिसांनी याप्रकरणाची नगररचना विभागाकडून माहिती घेतली. बनावट मोजणी नकाशावरून मागील पंधरा दिवसांपूर्वी पालिकेचा नगररचना विभाग चचेर्ला आला होता. नेहमीच वाद आणि चर्चेच्या भोवऱ्यात असलेला नगररचना विभाग टीडीआर घोटाळा चौकशीमुळे पुन्हा चचेर्ला आला आहे. या विभागात मागील २० वर्षांपासून ठराविक अभियंते १० वर्ष ते १८ वर्ष एकाच विभागात काम करत आहेत. या कर्मचाऱ्यांची या विभागात मनमानी असल्याच्या अनेक तक्रारी पालिका, शासनस्तरावर आहेत. त्याची दखल राजकीय दबावामुळे कोणी घेत नसल्याचे तक्रारदारांनी सांगितले. बनावट मोजणी नकाशा प्रकरणात नगररचना विभागातील दोन कर्मचारी बाजारपेठ पोलिसांनी अटक केल्यानंतर आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड नगररचना विभागातील ठाणमांड्या अभियंत्यांची उचलबांगडी करून या विभागाची सफाई करतील अशी जाणत्या नागरिकांची अपेक्षा होती.

## अनुराग ठाकूर यांची घोषणा; ‘खेलो इंडिया’तील पदक विजेत्यांना मिळणार सरकारी नोकरी

**■नवी दिल्ली, प्रगती शर्मा:** केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांनी सांगितले की, खेलो



इंडिया पदक विजेते खेळाडू आता सरकारी नोकऱ्यांसाठी पात्र होतील, ट्विटरवरील एका पोस्टमध्ये, क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर म्हणाले की, खेलो इंडियातील पदक विजेते खेळाडू आता सरकारी नोकऱ्यांसाठी पात्र असतील. मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की @DoPTGoI ने @IndiaSports शी सल्लामसलत करून, सरकारी नोकऱ्या मिळवणाऱ्या खेळाडूंच्या पात्रता निकषांमध्ये प्रगतीशील सुधारणा केल्या आहेत, असं अनुराग ठाकूर यांनी म्हटलं आहे. २०१८ मध्ये पहिल्यांदा खेलो इंडिया गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हापासून या खेळांनी प्रचंड लोकप्रियता मिळवली. परंतु आता क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांनी खेळांच्या निकषांमध्ये मोठा बदल केला आहे. खेलो इंडियामध्ये पदक जिंकणारे खेळाडू आता सरकारी नोकरीसाठी पात्र ठरणार आहेत.

यापूर्वी खेलो इंडिया गेम्सचे खेळाडू सरकारी नोकऱ्यांसाठी पात्र नव्हते, पण सरकारने खेळाडूंना मोठी भेट दिली आहे. अनुराग ठाकूर यांनी ट्वीटरवर लिहिले की, मला हे जाहीर करताना अतिशय आनंद होत आहे की, कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग आणि युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय यांच्याशी चर्चा केल्यानंतर सरकारी नोकऱ्यांचे निकष बदलण्यात आले आहेत. या पावलामुळे आता खेलो इंडियाचे पदक विजेते खेळाडू सरकारी नोकऱ्यांसाठी पात्र असतील. या सुधारित नियमांमुळे भारत क्रीडा महासत्ता बनवण्याच्या दिशेने पाऊल टाकेल.

## ठाण्यात दिघे साहेबांच अस्तित्व कोण पुसतयं ? आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांचा सवाल




**■ठाणे, दिगंबर जाधव :** मुंबई आणि ठाण्याच्या प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेली कमान सुमारे वर्षेभरापूर्वी पाडण्यात आली होती. या कमानीवर शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांचे नाव होते. ही कमान अद्यापही उभारण्यात आली नसल्याने आनंद दिघे यांचे पुतणे तथा ठाकरे गटाचे ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे यांनी ठाण्यात दिघे साहेबांच अस्तित्व कोण पुसतंय असा प्रश्न उपस्थित केला आहे. ठाणे आणि मुंबईच्या वेशीवर म्हणजेच आनंद नगर जकात नाका येथे अनेक वर्षांपासून एक कमान होती. त्या कमानीला शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांचे नाव देण्यात आले होते. ही कमान काही कामानिमित्त महापालिका प्रशासनाने काढली होती. त्याठिकाणी नव्याने कमान उभारण्यात येईल असा दावा महापालिका प्रशासनाने केला होता. परंतू, ही कमान काढून दीड वर्षे उलटून गेले तरी, महापालिका प्रशासनाकडून अद्याप याठिकाणी कमान उभारण्यात आलेली नाही. त्यामुळे ठाण्यात दिघे साहेबांच अस्तित्व पुसलं जातंय का? , यामागचा नेमका उद्देश काय आहे, असा प्रश्न ठाकरे गटाचे ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे यांनी उपस्थित केला आहे.

## स्त्रियांनी जीवनात यशस्वी होण्याकरिता सकारात्मक भूमिका ठेवावी- उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**■कल्याण, दिगंबर जाधव :** पुणे, सचिन कदम : आंतरराष्ट्रीय महिला दिन हा फक्त महिलांचा उत्सव म्हणून साजरा न होता तो महिलांना हक्क, न्याय मिळवून देणारा आणि महिला सशक्तीकरणावर भर देणारा असावा. स्त्री-पुरुष या दोघांमध्येही समानतेची भूमिका येणे आवश्यक असून स्त्रियांनी जीवनात यशस्वी होण्याकरिता सकारात्मक भूमिका ठेवावी, असे प्रतिपादन विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. महाराष्ट्र कारागृह विभागाच्यावतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय कारागृह महिला परिषदेचे उद्घाटन व महाराष्ट्र कारागृह सांख्यिकी पुस्तिका सन २०२२ चे प्रकाशन डॉ. गोऱ्हे



यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी अप्पर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह अमिताभ गुप्ता, कारागृह उपमहानिरीक्षक पश्चिम विभाग येरवडा स्वाती साठे, कारागृह उपअधीक्षक पल्लवी कदम आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान काम, समान अधिकार असावेत. घरकामात पुरुष वगार्चा सहभाग वाढला पाहिजे. यामुळे स्त्रियांना त्यांच्या कामात प्रगती करता येईल. समाजात वावरताना प्रत्येक घटकाबद्दल सकारात्मक भूमिका ठेवली पाहिजे. यासोबतच मन संतुलीत करण्यासाठी सकारात्मकता आवश्यक आहे. यातून एक विशिष्ठ शक्ती निर्माण होत असते. स्त्री संवेदनशील आहे, पण ती तेवढीच हुशार आणि तल्लखही आहे. प्रत्येक वेळी आपल्यासोबत कोणी असेलच याची वाट न पाहता स्त्रियांनी एकट्याने संकटाला सामोरे जावे. त्यासाठी योग्य निर्णय घेण्याची क्षमता त्यांनी ठेवली पाहिजे. समाजात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या माणसांना शिस्त लावण्याचे काम कारागृह करत आहे.

## महाशिवरात्रीनिमित्त बेस्टची अतिरिक्त बस सेवा



**■नवी मुंबई, भावना जैन** : महाशिवरात्रीच्या निमित्त शुक्रवारी मुंबईच्या काही भागात प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्ट उपक्रमाच्यावतीने अतिरिक्त बसगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ह्यकान्हेरी गुंफा येथील पुरातन लेण्यांना भेट देणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन बसमार्ग क्रमांक १८८ मर्यादित या मार्गावर एकूण सहा जादा बस चालवण्यात येणार आहेत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ते कान्हेरी गुंफादरम्यान शुक्रवारी सकाळी ११ पासून सायंकाळी ७.३० पर्यंत एकूण सहा जादा बसगाड्या चालिवण्यात येणार आहेत. तसेच बोरिवली रेल्वे स्थानक (पूर्व) ते कान्हेरी गुंफादरम्यान नियमित बससेवा कार्यरत राहतील. प्रवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी गर्दीच्या ठिकाणी विशेषतः संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रवेशद्वार, एलोरा चौकी (बोरिवली स्थानक-पूर्व) तसेच कान्हेरी गुंफा येथे बस निरीक्षक आणि वाहतूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त दक्षिण मुंबईमधील बाबुलनाथ येथील शिव मंदिरास भेट देणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी शुक्रवारी सकाळी ७ ते सायंकाळी ७ दरम्यान बसमार्ग क्र. ५७, ६७ आणि १०३ या बस मार्गांवर एकूण सहा जादा बसगाड्या चालवण्यात येणार आहेत. बाबुलनाथ मंदिर येथे भाविकांना मार्गदर्शन करण्यासाठी वाहतूक अधिकारी व बस निरीक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

## मुंबईत आरोग्य आपल्या दारी मोहीम; एप्रिलपासून मुंबईत झीरो प्रिस्क्रिपशन पॉलिसी

**■मुंबई, विशाल कारंडे :** मुंबईतील वरळी भागातील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अचानक भेट दिली. यावेळी त्यांनी दवाखान्याची पाहणी करतानाच तपासणीसाठी आलेल्या रुग्णांशीदेखील संवाद साधला. मुंबईकरांचा आरोग्य उपचारावरील खर्च कमी करण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. आरोग्य आपल्या दारी मोहीम सुरु करण्यात आली असून या मोहिमेतून घरोघरी जाऊन आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. एप्रिलपासून झीरो प्रिस्क्रिप्शन पॉलिसीदेखील सुरु करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. वरळीतील अभियांत्रिकी संकुलातील



आपला दवाखान्यात मुख्यमंत्र्यांचे अचानक आगमन झाले. त्यांनी दवाखान्यातील, स्टोर रुम, औषध कक्ष, तपासणी खोली, स्वच्छतागृह यांची पाहणी केली. यावेळी तेथे तपासणीसाठी आलेल्या काही ज्येष्ठ नागरिकांशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधत आपला दवाखान्याविषयी अनुभव विचारला. रुग्णांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, मुंबईकरांना उपचारासाठी घराजवळच सोय व्हावी या संकल्पनेतून आपला दवाखाना मुंबईत २२६ ठिकाणी सुरू करण्यात आले आहेत. आतापर्यंत ४२ लाख नागरिकांनी त्याचा लाभ घेतला आहे. याठिकाणी उपचार मोफत, कॅशलेस,पेपरलेस मिळत आहेत. मुंबईत आरोग्य आपल्या दारी मोहिमेतून घरोघरी आरोग्य तपासणी केली जाणार आहे. झीरो प्रिस्किपशन पॉलिसी एप्रिलपासून सुरू होणार आहे. त्यासाठी १५०० कोटी रुपयांची तरतूद केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी मुंबई शहर पालक मंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई महापालिका आयुक्त इकबालसिंह चहल, अतिरिक्त आयुक्त वेलारासू, डॉ. सुधाकर शिंदे आदी उपस्थित होते.

## मुंबई-गोवा महामार्गावर कारमधून गांजा विक्रीसाठी आलेला अटकेत

**■नवी मुंबई, विशाल पाटील :** मुंबई-गोवा महार्गावरील पळस्पा फाटा येथे कारमधून गांजा विकण्यासाठी आलेल्या व्यक्तीला अमली पदार्थविरोधी पथकाने सापळा रचून अटक केली. मोहम्मद वसीम मोहम्मद शफीक कुरेशी (४३) असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव असून पोलिसांनी त्याच्याजवळ असलेला सुमारे १२ लाख २५ हजार रुपये किमतीचा ६१ किलो २०० ग्रॅम गांजा व १० लाख रुपये किमतीची इर्टिगा कार जप्त केली आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे फाटा येथे एक व्यक्ती कारने सोमवारी मध्यरात्री गांजा विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी पथकाला मिळाली होती. माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नीरज चौधरी व त्यांच्या पथकाने सापळा लावला होता. त्यानंतर मध्यरात्री दीड वाजण्याच्या



सुमारास त्या ठिकाणी आलेल्या एका पांढऱ्या रंगाच्या कारमधील मोहम्मद वसीम मोहम्मद शफीक कुरेशी याला संशयावरून ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या तपासणीत मोहम्मद वसीम याच्याजवळ असलेल्या दोन पिशव्यांमध्ये हिरवी पाने, फुले, काड्या, बिया असा ६१ किलो २०० ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला. रसायनी येथील शिवा ठाकूर याच्या सांगण्यावरून त्याने गांजा आणल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर अमली पदार्थविरोधी पथकाने पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

## डोंबिवली एमआयडीसी परिसरात पुन्हा प्रदूषण

**■डोंबिवली : प्रतिनिधी,** डोंबिवली एमआयडीसी निवासी विभाग आणि आसपासच्या परिसरात पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात रासायनिक प्रदूषण होत आहे. गटारातून रासायनिक सांडपाणी सोडले जात असल्याने त्याच्या उग्र वासामुळे रहिवासी कमालीचे त्रस्त झाले आहेत. एमआयडीसीमधील प्रदुषणाबाबत वारंवार प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पाठपुरावा करून देखील ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. त्यामुळे त्रस्त नागरिकांनी सह्यांची मोहीम सुरू केली असून 3 हजार नागरिकांच्या सह्यांचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, स्थानिक प्रतिनिधी, एमआयडीसी व प्रदूषण नियंत्रण मंडळाला देण्यात येणार आहे.त्यानंतर देखील प्रदूषणाबाबत उपयोजना झाली नाही तर येत्या लोकसभा



निवडणुकीत लोकप्रतिनिधींना आणि मते मागण्यासाठी येर्णायांना स्थानिक नागरिक जाब विचारणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

डोंबिवली एमआयडीसी परिसरात अनेक ठिकाणी फुटलेल्या वाहिन्यामधून केमिकल मिश्रित सांडपाणी गटारातून , नाल्यातून वाहत असते. या रासायनिक सांडपाण्याच्या उग्र वासामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एमआयडीसीमध्ये कधी वायू प्रदूषण तर कधी जल प्रदूषण होत असते. याबाबत स्थानिक नागरिकांनी यापूर्वी अनेकदा एमआयडीसी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी केल्या. मात्र आश्वासनांपलिकेड काहीच ठोस कारवाई होत नसल्याने एमआयडीसी निवासी विभाग आणि आजूबाजूच्या परिसरातील नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. त्यातूनच या समस्येबाबत आता स्थानिक नागरिक एकवटले आहेत. ही समस्या निकाली काढण्यासाठी नागरिकांनी सह्यांची मोहीम सुरू केली. तब्बल तीन हजार सह्यांचे निवेदन स्थानिक नागरिकांकडून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि एमआयडीसी प्रशासनाला देण्यात येणार असल्याचे नागरिकांनी सांगितले.

## कोणतीही करवाढ व दरवाढ नसलेला काटकसरीचा ठाणे महापालिकेचा अर्थसंकल्प मंजूर

**■ठाणे : प्रतिनिधी,** कोणतीही करवाढ नसलेला तरीही महसुली खर्चावर नियंत्रण, महसुली उत्पन्न वाढविण्यावर भर, कामांचा दर्जा उत्तम रहावा याकडे विशेष लक्ष देणारा काटकसरीचा सन 2023- 2024 चा सुधारित 5988 कोटी 09लक्ष रूपयांचा तर सन 2024-2025 सालचा 5025 कोटी 01 लक्ष रूपयांचा मूळ अर्थसंकल्प गुरुवारी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सादर करीत मंजूर केला. ठाणे महापालिकेच्या उत्पन्नाच्या सर्वच बाबींचा अतिशय काळजीपूर्वक विचार करुन प्रत्यक्ष प्राप्त होणा-या एकूण उत्पन्नाचा प्रामुख्याने विचार विनिमय करुनच हा अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे. महसुली उत्पन्न वाढविण्यावर भर, खर्चामध्ये वित्तीय शिस्त, अनावश्यक महसुली खर्चात कपात, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण या त्रिसुत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी, भांडवली कामातंर्गत घेतलेली कामे पूर्ण करण्याचे नियोजन, प्रशासकीय कामकाजामध्ये सुधारणा, प्राप्त अनुदानातील कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन, कामांचा दर्जा उत्तम रहावे याकडे विशेष लक्ष देण्यात येणार असल्याचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी नमूद केले. सन 2023-24 मध्ये रु. 4370 कोटी रकमेचा अर्थसंकल्प तयार करण्यात आला होता. यामध्ये पाणीपुरवठा आकार, अग्निशमन दल, जाहिरात, स्थावर मालमत्ता इत्यादी विभागांच्या उत्पन्नात घट येत असली तरी शहर विकास विभागाच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. त्यामुळे महसूली उत्पन्न रु. 3160 कोटी 16 लक्ष ऐवजी रु 3092 कोटी 39 लक्ष सुधारित करण्यात आले आहे.

## मंगळसूत्र चोरणाऱ्या सख्या भावासह दागिने खरेदी करणारा अटकेत

**■पिंपरी, अभिजित येरुल्लू :** भोसरी परिसरातून महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावणाऱ्या दोन सख्या भावांना आणि चोरीचे दागिने विकत घेणा-याला पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून आठ तोळे सोने, दुचाकी असा चार लाख १५ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला. अक्षय राजू शेरावत (वय २३), अजय राजू शेरावत (वय २२, दोघे रा. हिंगणगाव, हवेली) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. तर, अनिल अंकुश नानावत (वय ३९, रा. सणसवाडी, ता. शिरूर) याला चोरीचे दागिने खरेदी केल्याप्रकरणी अटक केली आहे. भोसरीतील बोऱ्हाडेवाडीतून एका पादचारी महिलेच्या



गळ्यातील मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या आरोपींनी हिसकावून नेले होते. याबाबत एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचा तपास करत असताना चोरीचे दागिने विकण्यासाठी दोघेजण खडी मशीन रोडवर येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सापळा लाऊन अक्षय आणि अजयला ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरीचे दागिने अनिल नानावत याने खरेदी केल्याचे समोर आल्याने पोलिसांनी त्याला देखील अटक केली.

या कारवाईमुळे एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यातील तीन आणि देहूरोड पोलीस ठाण्यातील एक असे चार गुन्हे उघडकीस आले आहेत.

# भरल्या कांद्याची भाजी

**साहित्य :** लहान आकाराचे कांदे १/२ किलो, किसलेले खोबरे पाव वाटी, ४ चमचे तीळ, २५० ग्रॅम दाणे, १/२ चमचा जिरे, १ चमचा धने, १ चमचा गोड मसाला, ओले खोबरे, कोथिंबीर, तिखट, मीठ, चिंचेचे पाणी, गूळ, फोडणीचे साहित्य.

**कृती :** कांद्याचा वरचा व थोडा खालचा भाग व साल काढून चार फाकी होतील अशी चिरावीत. नंतर खोबऱ्याचा कीस, तीळ व शेंगदाणे, धने, जिरे हे सर्व कोरडे भाजून कूट करावे. या कुटात चवीप्रमाणे मीठ, तिखट, गूळ, मसाला, थोडी हळद, १-२ चमचे तेल व चिंचेचे पाणी घालून बारीक वाटावे व हे सर्व मिश्रण कांद्याच्या चार फाकीमध्ये फाक वेगळी होऊ न देता दाबून भरावे. कढईत फोडणी तयार करून त्यात भरलेले कांदे टाकावेत व मंद आचेवर ठेवून थोड्या वेळाने रस्स्याकरिता गरम पाणी टाकून उकळू द्यावे व साधारण नरम कांदे झाल्यावर त्यात कोथिंबीर व ओले खोबरे टाकावे. ही भाजी चवदार लागते.



# त्वचेची काळजी घेताना या सवयी टाळणे आवश्यक

अतिशय नितळ, सुंदर, मुलायम असणारी त्वचा कधी तरी पाहता पाहता निस्तेज, रुक्ष दिसू लागते, या मागे अनेक कारणे असू शकतात. त्वचेमध्ये जास्त 'सीबम' तयार होणे, प्रदूषण, असंतुलित आहार, झोपेचे बिघडलेले वेळापत्रक याचे एकत्रित परिणाम त्वचेवर दिसून येत असतात. याशिवाय काही लहान मोठ्या सवयींमुळेही आपल्या नकळत त्वचेला अपाय होत असतो. या सवयी टाळणे आवश्यक आहे.

**अनेकांना** आपल्या चेहऱ्याला सतत हात लावण्याची सवय असते. पण अशा वेळी लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, आपल्या हातांनी आपण सतत कुठल्या ना कुठल्या वस्तूला स्पर्श करीत असतो. त्यामुळे आपल्या हातांवर निरनिराळ्या किटाणूंचा प्रादुर्भाव होत असतो. सतत चेहऱ्याला हात लावल्याने या किटाणूंचा संसर्ग आपल्या त्वचेवर होत असतो. परिणामी चेहऱ्यावर मुरुमे-पुटकुळ्या येऊ लागतात. त्यामुळे चेहऱ्याला हात लावताना आपले हात स्वच्छ असतील याची काळजी घेणे आवश्यक आहे.

ऋतू कोणताही असो, घराच्या बाहेर पडण्यापूर्वी सनस्क्रीन लावणे गरजेचे असते. सनस्क्रीनची गरज केवळ उन्हाळ्यातच असते अशी काही जणांची समजूत असते, पण ती चुकीची आहे. सनस्क्रीन हे उन्हाळ्याप्रमाणे, हिवाळा किंवा पावसाळ्यामध्येही तितकेच गरजेचे आहे. सनस्क्रीन केवळ उन्हापासूनच नाही, तर धूळ आणि प्रदूषणापासूनही त्वचेचा बचाव करीत असते. सनस्क्रीन लावताना केवळ चेहऱ्यावर न लावता, मानेवर, गळ्यावर तसेच त्वचेचा जो भाग कपड्याने झाकलेला नाही, त्यावर लावणे आवश्यक आहे.





कॉफीचे अतिसेवनही त्वचेला अपायकारक ठरू शकते. कॉफीच्या अतिसेवनाने डीहायड्रेशन होऊन त्यामुळे त्वचेवर सुरकुत्या पडू शकतात. त्यामुळे कॉफीचे सेवन मर्यादेमध्येच करावयास हवे, त्वचेवरील मृत पेशी हटवण्यासाठी, त्वचा 'एक्सफोलीएट' करणे आवश्यक असते. त्यामुळे त्वचेवरील मृत पेशी हटवल्या जाऊन त्वचा चमकदार बनते. पण जर 'एक्सफोलीएशन' जास्त प्रमाणात केले गेले तर त्वचेला मुलायम ठेवणारी आर्द्रता आणि ऑईल्स त्वचेमधून निघून जाऊन त्वचा निस्तेज आणि कोरडी बनी लागते. त्यामुळे जरी एक्सफोलीएशन करायचे झाले तरी ते वारंवार करण्याची सवय टाळायला हवी. त्याचप्रमाणे एक्सफोलीएशन करण्याकरिता शक्यतो नैसर्गिक पदार्थांचा वापर करावा.

त्वचेची निगा राखताना शक्यतो नैसर्गिक आणि साधे पदार्थ वापरावेत. तसेच वारंवार निरनिराळ्या ब्युटी ट्रीटमेंट त्वचेवर करून घेणे टाळायला हवे. त्वचेची निगा राखण्यासाठी जे उपाय अवलंबले जातील, त्याने जर त्वचेला फायदा होत असेल तर तेच स्कीन केअर रुटीन कायम ठेवावे. वारंवार प्रसाधने बदलणे, किंवा त्वचेवर नित्य नवी क्रीम्स वापरून पाहण्याचा मोह टाळायला हवा.

# सतत सोडा प्यायल्याने स्मृतिभ्रंशाचा धोका

मेंदूचा आकार कमी होतो जे लोक नियमितपणे सोडा घेतात त्यांना इतरांच्या तुलनेत तीनपट अधिक स्ट्रोक आणि स्मृतिभ्रंश होण्याचा धोका असल्याचा इशारा नवीन अभ्यासात देण्यात आला आहे. यासह जे लोक सोडा आणि फळांचा रस ही अधिक साखरेची पेये सातत्याने घेतात त्यांची स्मृती कमी होण्यासह एकूणच मेंदूचा आकार लहान होणे व हिप्पोकॅम्पलचा आकार लहान होत असल्याचे संशोधकांना आढळून आले आहे.

**उच्च** प्रमाणात साखरेचे प्रमाण असलेले पेय घेणे आणि त्याचा स्मृती तसेच मेंदूचा आकार कमी होणे याचा परस्परसंबंध असल्याचे अमेरिकेच्या बोस्टन विद्यापीठातील स्कूल ऑफ मेडिसिनच्या मॅथ्यू पेस यांनी म्हटले आहे. जे लोक नियमितपणे सोडा घेतात त्यांना इतरांच्या तुलनेत तीनपट स्ट्रोक आणि स्मृतिभ्रंश येण्याचा धोका असतो. यासह मेंदूमध्ये रक्तपुरवठा पोहोचण्यास अडथळा निर्माण होण्यासह अल्झायमर आजार होतो, असे त्यांनी म्हटले.

अति प्रमाणात साखर शरीरात गेल्यामुळे त्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होतो. अनेकदा शीतपेयाला अधिक आरोग्यदायी पर्याय म्हणून सोडा घेतात. मात्र ही दोन्ही उत्पादने कृत्रिमरीत्या गोड केली जातात. त्यामध्ये साखरेचे अधिक प्रमाण असते. ही दोन्ही उत्पादने घेतल्यामुळे हृदयाशी संबंधित आजार होत असून, मेंदूच्या वाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण होण्यासह स्मृतिभ्रंश होण्याचा धोका अधिक आहे.

या अभ्यासासाठी ३० वर्षे वयाच्या जवळपास ४ हजार लोकांचा समावेश करण्यात आला होता. यामध्ये त्यांचे एमआरआय तसेच मेंदूशी संबंधित इतर चाचण्या करण्यात आल्या. त्यानंतर हे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

हे संशोधन 'अल्झायमर ॲण्ड डिम्नेशिया, ॲण्ड स्ट्रोक' या नियतकालिकामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहे.



# बहुगुणकारी ताडगोळे

ताडगोळे हे फळ वर्षामध्ये ठरावीक ऋतूमध्ये, म्हणजे उन्हाळ्यामध्ये उपलब्ध असणारे फळ आहे. याची चव काहीशी शहाळ्यातील मलई प्रमाणे लागत असून, चवीला हे फळ मधुर असते. इंग्रजी भाषेमध्ये 'आईस ॲपल' या नावाने ओळखले जाणारे हे फळ आरोग्याच्या दृष्टीने देखील अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते. या फळाला मुंजाल या नावानेही काही प्रांतांमध्ये ओळखले जाते. या फळाचे आरोग्यासाठी असणारे फायदे जाणून घेऊ



**ज्यांना** वजन घटवायचे असेल, त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे आणि यामध्ये असलेल्या रसामुळे भूक शमण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार काही ना काही खाण्याची इच्छा होत नाही. ज्यांना लिव्हरशी निगडित काही समस्या असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उपयुक्त आहे. या फळामध्ये पोटॅशियम मुबलक मात्रेमध्ये असून त्यामुळे लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनामुळे शरीराला श्रम करण्यासाठी आवश्यक ताकद आणि ऊर्जा मिळत असते. या फळाच्या सेवनामुळे शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्यामुळे दिवसभराच्या कामासाठी लागणारी ताकद या फळाच्या सेवनाने मिळत असते.

या फळाच्या सेवनाने शरीराला आवश्यक असलेले क्षार आणि इतर पोषक तत्त्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात. ज्यांना त्वचेवर उन्हाळ्यामुळे सतत पुरळ येत असेल किंवा ज्यांना या दिवसांमध्ये चेहऱ्यावर सतत मुरुमे येत असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोगप्रतिरोधी तत्त्वे असून, विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले गेले आहे. या फळामध्ये अँथोसायनिन नामक फायटोकेमिकल स्तनाच्या कर्करोगापासून बचाव करणारे आहे. आरोग्यासाठी या फळाचे फायदे पुरेपूर मिळवण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये या फळाचे भरपूर सेवन

# कोणतेही ॲप डाऊनलोड करताना राहा सावध!

## 'या' ४ गोष्टींकडे द्या विशेष लक्ष, नुकसान होणार नाही

**युजर्स** गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहिती आहे का? गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे कधी-कधी धोकादायक ठरू शकते. कसे ते जाणून घ्या. आजकाल प्रत्येकाकडे स्मार्टफोन असतो आणि त्यामध्ये अनेक ॲप्स असतात. या ॲप्समुळे रोजची अनेक महत्त्वाची कामे कुठल्याही अडचणींशिवाय पार पडतात. अनेक जण गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहीत आहे का की, काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. तुम्ही अँड्रॉइड युजर असाल तर ही विशेष माहिती नक्कीच तुमच्या कामी येईल. पाहा डिटेल्स.



**हे असू शकते धोकादायक**

काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. कारण, गुगल प्ले स्टोअर मालवेअर आणि हॅकर्ससाठी ॲप्स फारसे स्कॅन करत नाही. अशा परिस्थितीत गुगलच्या स्टोअरवर मालवेअर प्रभावित ॲप्स असण्याची शक्यता आहे. तुम्ही हे ॲप डाऊनलोड केल्यास ते तुमचा वैयक्तिक डेटा चोरू शकतात. हे तुमची आर्थिक ओळखपत्रे देखील चोरू शकतात.

**असे सुरक्षित रहा**

तुम्ही डाऊनलोड करत असलेले ॲप तुम्हाला कोणत्या पर्मिशन्स विचारतात याकडे नेहमी लक्ष दिले पाहिजे. उदाहरणार्थ- तुम्ही एडिटिंग ॲप डाऊनलोड केल्यास ते ॲप तुम्हाला स्टोरेज, कॅमेरा, मायक्रोफोन आणि फोटो गॅलरी यासाठी परवानगी मागते. पण त्या ॲपला कोणत्या परवानग्या हव्यात याकडे तुम्हाला लक्ष द्यावे लागेल. जेव्हाही आपण एखादे ॲप डाऊनलोड करतो तेव्हा त्याचे रिव्ह्यू नक्की वाचा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण, लोक त्यांच्या ॲपच्या अनुभवावर आधारित रिव्ह्यू देतात. तुम्हाला ॲपचे वाईट रिव्ह्यू आढळल्यास ॲप डाऊनलोड करू नका. जेव्हा तुम्ही एखादे ॲप डाऊनलोड करता, त्याआधी ते ॲप किती वेळा डाऊनलोड केले आहे ते पहा. ही तपासणी करणेदेखील महत्त्वाची आहे. कारण, जितक्या जास्त लोकांनी ॲप डाऊनलोड केले आहे तितकाच ॲपवर अधिक विश्वास निर्माण होतो. गुगल प्ले स्टोअरवर प्रत्येक ॲप निर्माता त्यांच्या ॲपबद्दल तपशील देतो. त्याचा स्त्रोत काय आहे हेदेखील सांगतो. जर तुम्हाला स्त्रोत योग्य वाटत असेल किंवा तपशील बरोबर असतील तरच ॲप डाऊनलोड करा.

# अशोक सराफ यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान; पत्नी निवेदिता यांनी शेअर केला खास व्हिडीओ

■**नवी दिल्ली- प्रगती शर्मा**

महाराष्ट्राचे लाडके अभिनेता आणि नुकतेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरवण्यात आलेले अशोक सराफ यांना बुधवारी संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संगीत नाटक अकादमीचे २०२२ आणि २०२३ या वर्षासाठीचे पुरस्कार एकूण ९४ कलाकारांना राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आले. शास्त्रीय संगीत, नृत्य, नाटक अशा विविध कलाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या देशभरातील कलाकारांना दरवर्षी संगीत नाटक अकादमी या पुरस्काराने सन्मानित केलं जातं. यावेळी महाराष्ट्र भूषण अशोक सराफ यांना २०२२ या वर्षासाठीचा संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यानिमित्त त्यांच्या पत्नी आणि अभिनेत्री निवेदिता सराफ यांनी त्याचा व्हिडीओ शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या. महाराष्ट्र भूषण ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी या कार्यक्रमाला पत्नी निवेदिता यांच्यासह उपस्थिती लावली होती. निवेदिता यांनी त्यांच्या सोशल मीडियावरुन हा व्हिडिओ शेअर केलाय. खूप खूप अभिमान वाटला अशोकला हा पुरस्कार स्वीकारताना पाहून. आम्ही दोघंही महाराष्ट्राच्या जनतेचे ऋणी आहोत, अशा शब्दात निवेदिता सराफ यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. निवेदिता सराफ यांनी शेअर केलेल्या या व्हिडिओवर अनेकांनी कमेंट्स करत लाडक्या अशोकमामांचं अभिनंदन केलं आहे. संगीत नाटक अकादमी पुरस्कार सोहळ्याचा कार्यक्रम दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित करण्यात आला होता. यावेळी द्रौपदी मुर्मू यांनी देशातील कलाकार आपली भारतीय कला आणखी समृद्ध करत राहतील असा विश्वास व्यक्त केला. अशोक सराफ यांच्यासह देवकी पंडित, विजय चव्हाण, ऋतुजा बागवे, कलापिनी कोमकली या कलाकारांचा देखील सन्मान करण्यात आला आहे. दरम्यान, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ ५० वर्षांहून अधिक काळ प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. अशी ही बनवाबनवी, धूमधडाका, आम्ही सातपुते ते नुकताच प्रदर्शित झालेला वेड अशा असंख्य गाजलेल्या चित्रपटांमध्ये त्यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. ऐंशीच्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन आणि अशोकमामा या तिकडीने महाराष्ट्राला खळखळून हसवलं. त्यांनी प्रेक्षकांचं केवळ मनोरंजन नाही केलं तर मराठी चित्रपटाचा एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं. फेब्रुवारीमध्ये राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. आता संगीत नाटक अकादमी पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलं आहे.



# भव्य बाईक रॅलीचे आयोजन करत कलर्स मराठीने साजरा केला महिला दिन



■ **मुंबई, प्रतिनिधी,** जगभरात सगळीकडे महिला दिन साजरा होत असतानाच कलर्स मराठीवरील मालिकांमधील कलाकारांनीही मोठ्या जल्लोषात महिला दिन साजरा केला. कलर्स मराठीतर्फे आजोजित करण्यात आलेल्या महिलांची भव्य बाईक रॅलीला अनेक कलाकारांनी उपस्थिती लावली. यावेळी महिला दिनानिमित्त आयोजिलेल्या या खास बाईक रॅलीमध्ये भाग्य दिले तू मलाया मालिकेतील रत्नमाला (निवेदिता सराफ), कावेरी (तन्वी मुंडले), काव्यांजलीमधील मीनाक्षी ( पूजा पवार), काव्या (कश्मिरा कुलकर्णी) सहभागी झाल्या होत्या. याशिवाय या रॅलीतील खास आकर्षण होते ती, लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या इंद्रायणी मालिकेतील इंदू म्हणजेच सांची भोईर.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - २६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | | | 7 | | 4 | |
| | | | 2 | 4 | | 7 | | 1 |
| | | 8 | | | 1 | 9 | | |
| 7 | | | | 9 | | 1 | | |
| 9 | 5 | 3 | | | 4 | | | |
| | 6 | | 3 | 5 | | | 7 | |
| | 9 | | 7 | | | 5 | 1 | |
| 3 | | 7 | 9 | 2 | | 8 | 6 | |
| 6 | | | | | | | | |

## उत्तर सुडोकू -२५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 5 | 3 | 9 | 7 | 6 | 1 | 4 | 8 |
| 7 | 4 | 6 | 2 | 8 | 1 | 3 | 9 | 5 |
| 8 | 9 | 1 | 4 | 3 | 5 | 2 | 6 | 7 |
| 9 | 8 | 2 | 7 | 6 | 3 | 5 | 1 | 4 |
| 3 | 7 | 4 | 5 | 1 | 9 | 6 | 8 | 2 |
| 1 | 6 | 5 | 8 | 2 | 4 | 7 | 3 | 9 |
| 4 | 3 | 9 | 1 | 5 | 7 | 8 | 2 | 6 |
| 5 | 1 | 8 | 6 | 4 | 2 | 9 | 7 | 3 |
| 6 | 2 | 7 | 3 | 9 | 8 | 4 | 5 | 1 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# दिनविशेष

## ८मार्च

- १८१७: न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंज (ठ रए) ची स्थापना.
- १९११: पहिल्यांदा जागतिक महिला दिन साजरा केला गेला.
- १९४२: दुसरे महायुद्धः जपानने म्यानमारची राजधानी रंगून जिंकली.
- १९४८: भारतीय विमानसेवा एअर इंडिया इंटरनॅशनल ने परदेशात आपली सेवा सुरु केली.
- १९४८: फलटण संस्थान भारतीय गणराज्यात विलीन झाले.
- १९५७: घाना देशाचा संयुक्त राष्ट्रांत (वल्ल३ीठिं३ङ्गल्ल२) प्रवेश.
- १९७४: चार्ल्स डी गॉल विमानतळ पॅरिस, फ्रान्स मध्ये सुरु झाले.
- १९७९: फिलिप्स कंपनी ने प्रथमच सार्वजनिकरित्या कॉम्पॅक्ट डिस्क चे प्रकाशन केले.
- १९९३: दमानिया एअरवेज या खाजगी विमानवाहतुक कंपनीने आपल्या पहिल्या विमानाला स्पिरीट ऑफ जे. आर. डी. असे नाव देण्याचे ठरविले.
- २०१६: पूर्ण घडलेले सूर्यग्रहण इंडोनेशिया आणि उत्तर पॅसिफिक मधून दिसले.
- १८६४: कादंबरीकार हरी नारायण आपटे यांचा जन्म. (मृत्यू: ३ मार्च १९१९)
- १८७९: नोबेल पारितोषिक विजेते जर्मन शात्रज्ञ ऑटो हान यांचा जन्म. (मृत्यू: २८ जुलै १९६८)
- १८८६: जीवरसायन शास्त्रज्ञ एडवर्ड कालव्हिन केन्डॉल यांचा जन्म.
- १९२१: गीतकार साहीर लुधियानवी यांचा जन्म. (मृत्यू: २५ ऑक्टोबर १९८०)
- १९२८: कथालेखक वसंत अनंत कुंभोजकर यांचा जन्म.
- १९३०: कवी, कादंबरीकार आणि नाटककार चिंतामण त्र्यंबक खालोलकर उर्फ आरतीप्रभू यांचा जन्म. (मृत्यू: २६ एप्रिल १९७६)
- १९३१: प्रसिद्ध सॅक्सोफोन वादक मनोहारी सिंग यांचा जन्म. (मृत्यू: १३ जुलै २०१०)
- १९६३: भारतीय क्रिकेटपटू गुरुशरणसिंग यांचा जन्म.
- १९७४: अभिनेता फरदीन खान यांचा जन्म.
- १७०२: इंग्लंडचा राजा विल्यम (तिसरा) यांचे निधन. (जन्मः १४ नोव्हेंबर १६५०)

# भविष्य

**मेष** नटण्याची हौस पूर्ण कराल. तुमचे व्यक्तिमत्व प्रभावी ठरेल. आनंदी दृष्टीकोन ठेवाल. प्रेमाच्या दृष्टीने नवीन मैत्री लाभेल.

**वृषभ** प्रवासात आरोग्याची काळजी घ्यावी. कामात चंचलता आड येऊ शकते. भावंडांची बाजू जाणून घ्यावी. टीकेकडे दुर्लक्ष करावे.

**मिथुन** मुलांच्या वेगळ्या खचार्चे नियोजन करावे. घेतलेल्या ज्ञानाचा योग्य उपयोग होईल. काहीसे छांदीष्टपणे वागाल.

**कर्क** उत्तम वाहन सौख्य लाभेल. घरातील ज्येष्ठांची मदत होईल. मनाचा सज्जनपणा दाखवाल. हसत खेळत सर्व गोष्टी पार पडाल. सजावटीच्या वस्तु खरेदी कराल.

**सिंह** दूरच्या प्रवासाचा योग येईल. मनातील निराशा बाजूस सारावी. चंचलतेत वाढ होऊ शकते. जवळचे मित्र भेटतील. भावंडांच्या समस्या समजून घ्याल.

**कन्या** जुन्या कामातून लाभ होईल. पैशाचा सदुपयोग कराल. खाण्या पिण्याबाबत चोखंदळ राहाल. मौल्यवान वस्तूंची आवड दर्शवाल. व्यावसायिक लाभ उत्तम होईल.

**तुला** आपले कर्तव्य योग्य रीतीने बजावाल. आपले मत इतरांना मान्य करायला लावाल. प्रशासकीय भूमिका घ्याल. कामाचा उरक वाढेल. चिकाटीने कामे कराल.

**वृश्चिक** आध्यात्मिक उन्नती साधण्याचा प्रयत्न कराल. ऐहिक गोष्टींची कामना करू नये. मनात नसतानाही प्रवास करावा लागेल. ढोंगी लोकांविषयी तिटकारा दाखवाल. ठाम निर्णयावर भर द्यावा.

**धनु** अचानक धनलाभ संभवतो. मित्रांशी मतभेद संभवतात. योग्य संधीसाठी वाट पहावी लागेल. मनातील इच्छा पूर्ण होईल. भडकपणे मत मांडू नका. करमणुकीसाठी अधिक वेळ घालवाल.

**मकर** जोडीदाराची कर्तबगारी दिसून येईल. शांत संयमी विचार कराल. कामात पत्नीचा हातभार लाभेल. जबाबदारीने कामे उरकाल. चार-चौघांत कौतुक केले जाईल. प्रकृतीची किरकोळ तक्रार जाणवेल.

**कुंभ** अधिकारी व्यक्तींचे मार्गदर्शन घ्यावे. कामातील दिरंगाई टाळावी. श्रद्धेची बाजू लक्षात घ्यावी. वडीलांच्या मताचा आदर करावा. इतरांना आनंदाने मदत कराल.

**मीन** मुलांचा उडणारा गोंधळ दूर करावा. सतत काळजी करत बसू नये. रेस जुगारातून लाभ संभवतो. भावनेच्या भरात वाहवून जाऊ नये. आवडीचे पदार्थ खायला मिळतील.


Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# व्यावसायिकांची फसवणूक करणाऱ्या परराज्यातील टोळीचा पर्दाफाश

## फॉरेन करन्सी एक्स्चेंज व्यावसायिकाची केली होती २५ हजार डॉलर्सची फसवणूक

**■मुंबई :** फिल्म लाइनच्या व्यवसायात असल्याची बतावणी करत फॉरेन करन्सी एक्स्चेंज व्यावसायिकाकडून २५ हजार अमेरिकन (यूएस) डॉलर्स घेऊन त्यांची फसवणूक करणाऱ्या परराज्यातील टोळीचा गुन्हे शाखेच्या कक्ष-८ने पर्दाफाश केला आहे. गुन्हे शाखेने माजिद खान ऊर्फ मन्नू (४४), मयंक शर्मा ऊर्फ लड्डू (२२) आणि आकाश अग्रवाल ऊर्फ कबीर ऊर्फ कब्बू (१९) यांना बेड्या ठोकल्या असून मुख्य सूत्रधार कृष्णन याचा पोलीस शोध घेत आहेत.

विलेपार्ले पूर्वेकडील चित्तरंजन रोड परिसरात राहात असलेल्या ४४ वर्षीय तक्रारदार यांचा विदेशी चलन बदलून देण्याचा (फॉरेन करन्सी एक्स्चेंज) व्यवसाय आहे. दिल्लीमधील ट्रॅव्हलिंग व्यावसायिकाने त्याच्या ओळखीच्या गौरव गोस्वामी नावाच्या दिल्ली येथे टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला फॉरेन करन्सी एक्स्चेंजसंदर्भात मदत पाहिजे असल्याचे सांगितले.



तक्रारदार यांनी गोस्वामीशी संपर्क साधला असता त्याने एका मोठ्या व्यक्तीला २५ हजार यूएस डॉलरची आवश्यकता असून तो सांताक्रुझमधील हॉटेल ग्रँड हयातमध्ये येणार असल्याचे सांगत कृष्णन नावाच्या व्यक्तीचा मोबाईल नंबर त्यांना पाठवला.

गोस्वामीच्या बोलण्यावर विश्वास ठेवत तक्रारदार हे २७ फेब्रुवारीला पत्नीसोबत यूएस डॉलर्स घेऊन कृष्णन याला भेटण्यासाठी हॉटेल ग्रँड हयातमध्ये गेले. हॉटेलच्या चौथ्या मजल्यावरील खोलीमध्ये कृष्णन नाव सांगणारा व्यक्ती त्यांना भेटला. त्याने फिल्म लाईन व्यवसायात आल्याचे सांगत हॉटेलच्या लॉबीमध्ये अभिनेता अक्षय कुमार याची शूटिंग चालू असल्याने येथे भेटायला बोलावल्याची बतावणी केली. पुढे त्याने तक्रारदार यांना बोलण्यात गुंतवून २५ हजार यूएस डॉलर्स घेत तेथून पळ काढला. सर्वत्र शोध घेऊनही कृष्णन न सापडल्याने तक्रारदारांनी वाकोला पोलीस ठाणे गाठून फसवणुकीची तक्रार दिली.गुन्हे शाखेच्या कक्ष ८चे प्रमुख प्रभारी पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत साळुंखे यांच्या पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला. व्यावसायिकांची फसवणूक करणारी टोळी यामागे असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेने उत्तर प्रदेशमधील रहिवासी खान याच्यासह दिल्लीतील रहिवासी शर्मा आणि अग्रवाल यांना अटक केली. तर, आरोपी कृष्णनचा शोध सुरू आहे.

टोळीने मुंबई आणि अन्य शहरातील पंचतारांकित हॉटेलमध्ये व्यावसायिकांना बोलावून घेऊन अशाप्रकारे फसवल्याचे समोर आले आहे. यात २५ जानेवारीला आरोपींनी फॉरेक्स ट्रेडिंग करणाऱ्या व्यावसायिकाची ३० लाख रुपयांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

### उडी मारून पळण्याचा संशयिताचा प्रयत्न फसला

**■मुंबई :** चोरीच्या गुन्ह्यात चौकशीसाठी आणलेल्या २५ वर्षीय संशयित आरोपीने गुरुवारी कांदिवली पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून उडी घेत पळून जाण्याचा प्रयत्न केला. समीर सिद्दीकी (२५) असे संशयित आरोपीचे नाव आहे. इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून उडी घेतल्याने त्याच्या पायाला दुखापत झाली आहे. या घटनेने पोलीस ठाण्यात एकच खळबळ उडाली होती. पोलिसांनी सिद्दीकी याला उपचारांसाठी येथील रुग्णालयात दाखल केले आहे. तो चोरी प्रकरणात संशयित आरोपी असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

### दादलानी कॉम्प्लेक्सला आग

**■ठाणे :** ठाण्याच्या बाळकूम परिसरातील दादलानी पार्क कॉम्प्लेक्स या तळ अधिक तीन माळ्याच्या इमारतीच्या तिसऱ्या माळ्यावर मंगळवारी बाथरूमच्या गिझरला आग लागली होती. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी आग पूर्णपणे विझवली. या घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी येत अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवले. या आगीच्या घटनेत गिझर, वॉशिंग मशीन व इतर काही साहित्याचे नुकसान झाले.

### शाळकरी मुलगा बेपत्ता

**■ ठाणे :** ठाण्याच्या कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या १५ वर्षीय शाळकरी मुलगा अचानक घरातून बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली. तक्रारदार रुक्मीणी सोमनाथ शिरसाट(४०) यांनी अल्पवयीन मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार कापूरबावडी पोलीस ठाण्यात दाखल केली.तक्रारदार रुक्मीणी सोमनाथ शिरसाट ठाण्याच्या नीलकंठ ग्रीन्स सोसायटी याठिकाणी घरकाम करून उदरनिर्वाह करते. तर दुसरीकडे तिची दोन मुले असून एक मुलगा ११ वीत शिकत आहे. तर दुसरा बेपत्ता झालेला मुलगा हा पालिकेच्या शाळेत ९ वीत शिकतो .दोन महिन्यापासून तो शाळेत जात नव्हता. घटनेच्या दिवशी तक्रारदार रुक्मीणी या कामावरून परत आल्यानंतर त्यांचा १५ वर्षीय अल्पवयीन मुलगा हा घरात नसल्याचे समोर आले.

### लाखाचा मोबाईल पळवला

**■ ठाणे :** ठाण्याच्या तीन हातनाका परिसरात उबेर टेक्सीची वाट पाहणाऱ्या डॉ. सतिश चंद्रकांत खर्डे (३९) यांच्या हातातील सॅमसंग कंपनीचा एस २३ अल्ट्रा हा १ लाखाचा मोबाईल स्कुटीवरील दोघांनी हिसकावून पोबारा केल्याची घटना रविवारी पहाटे घडली. याबाबत नौपाडा पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.डॉ. सतिश चंद्रकांत खर्डे हे कोपरखैरणे येथे राहतात. ते केंद्र सरकारच्या राजभाषा विभागात कार्यरत आहेत. त्यांच्याकडे सॅमसंग कंपनीचा एस २३ अल्ट्रा मॉडेलचा १ लाखाचा मोबाईल होता. रविवारी पहाटे ४-३० वाजण्याच्या सुमारास तीन हात नाका रिक्षा स्टॉप येथे आले. त्यांनी मोबाईलवरून उबेर टॅक्सी बुक केली. टॅक्सीची वाट पाहत असतानाच समोरून एक स्कुटीवरुन येणाऱ्या दोन अनोळखी तरुणांनी मोबाईल पळवला.

### प्रवाशाला मारहाण करून लुटले

**■ कल्याण :** कल्याण रेल्वे स्थानका बाहेर प्रवाशांना लुटण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. नाशिक येथून आलेल्या एका प्रवाशाला रेल्वे स्थानका बाहेर पकडून बेदम मारहाण करत लुटण्यात आल्याची घटना घडली आहे. लोहमार्ग पोलिसांनी याप्रकरणी हर्षल कदम याला अटक केली आहे.

# खांदेश्वर पोलीस ठाण्यात धुडगूस घालणारी महिला पोलिसांच्या ताब्यात

## महिला पोलीस अधिकारी व कॉन्स्टेबलला केली मारहाण

**■नवी मुंबई :** खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्याने संतप्त झालेल्या एका महिलेने पोलीस ठाण्यात धुडगूस घालून महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक व महिला पोलीस कॉन्स्टेबलना घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करून त्यांना धक्काबुक्की करत मारहाण केल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. कोमल पाटील असे या महिलेचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी तिच्याविरोधात विनयभंगासह शिवीगाळ करून मारहाण करणे, सरकारी कामात अडथळा आणणे आदी कलमानुसार गुन्हा दाखल करून तिला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात ताब्यात घेण्यात आलेली कोमल पाटील या महिलेविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात मंगळवारी रात्री दिलीप तळेकर हे तक्रार देण्यासाठी गेले होते. यावेळी तळेकर यांच्या सोबत



असलेल्या महिलेच्या छातीत अचानक दुखू लागल्याने या महिलेला तिचे नातेवाईकांनी रिक्षामधून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. मात्र यावेळी कोमल पाटीलने अत्यवस्थ असलेल्या महिलेला रिक्षामधून घेऊन जाण्यास विरोध केला. यावेळी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वृषाली पवार व महिला पोलीस कॉन्स्टेबल जोंधळे यांनी कोमल पाटील हिला समजावण्याचा प्रयत्न केला असता, कोमलने रिक्षाला सोडण्यास नकार देऊन महिला पोलिसांना धक्काबुक्की व शिवीगाळ केली.

यावेळी महिला पोलिसांनी कोमलला रिक्षातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला असता, कोमलने खाली लोळून सगळे पोलीस पैसे खातात असे मोठमोठ्याने ओरडून घाणेरड्या भाषेत शिवीगाळ केली. तसेच दोन्ही महिला पोलिसांना मारहाण करून त्यांची कॉलर पकडून धक्काबुक्की केली. त्यानंतर देखील पोलीस तिला समजावत असताना, कोमलने महिला पोलिसांना अपशब्द वापरले. यावेळी महिला पोलीस कोमलला सावरण्याचा प्रयत्न करत असताना, तिने सहाय्यक पोलीस निरीक्षक वृषाली पवार यांचे दोन्ही हात पिरगळून त्यांच्या मनगटावर नखाने ओरखडून जखमा केल्या. त्यानंतर तिने महिला पोलीस कॉन्स्टेबल जोंधळे यांना शिवीगाळ करून त्यांच्या पाठीत हाताने जोरात बुक्की मारली. त्यानंतर पोलिसांनी तिच्याविरोधात गुन्हा दाखल करून तिला ताब्यात घेतले.

# नोकरीचे आमिष दाखवून तरुणाला सात लाखांना गंडा

**■मुंबई :** आरोग्य विभाग आणि प्राप्तिकर खात्यात सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून बीडमधील एका व्यक्तीने काळाचौकीमधील २९ वर्षीय तरुणाकडून सात लाख रुपये घेऊन त्याची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. फसवणूक झालेल्या तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून प्रतीक जावळे नावाच्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून काळाचौकी पोलीस अधिक तपास करत आहेत.

परळ, काळेवाडीमध्ये कुटुंबासोबत राहात असलेला २९ वर्षीय अक्षय हा अंधेरीमध्ये खासगी नोकरी करतो. तो नाशिकमध्ये हेल्थ कॅम्पसाठी गेला असताना साहिल पाटील नावाच्या व्यक्तीशी त्याची ओळख झाली. त्याने बीडमधील रहिवासी प्रतीक जावळे हा पैसे घेऊन सरकारी नोकरी मिळवून देतो, असे सांगितले. साहिलच्या बोलण्यावर विश्वास ठेवून अक्षयने प्रतीकशी संपर्क साधला.

प्रतीकने त्याला आरोग्य विभागात जागा आहेत. त्यात शासकीय नोकरी मिळवून देण्याचे आमिष अक्षयला दाखवत २४ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या आरोग्य विभागातील परीक्षेला बसण्यास सांगत हॉल तिकीट पाठवले. त्याने फक्त शेवटचे चार प्रश्न सोडवायचे बाकी पूर्ण पेपर कोरा ठेवायचा. बाकी मी बघून घेईन, असे सांगितले. प्रतीकच्या सांगण्याप्रमाणे अक्षयने वडाळ्यातील एका हायस्कूलमध्ये परीक्षा दिली.

परीक्षा होताच प्रतीकने अक्षयकडे पैशांची मागणी सुरू केली. दीड लाख रुपये घेतल्यानंतर प्रतीकने 'दहा दिवसात शासकीय नोकरीचे नियुक्तीपत्र देतो, असे सांगून आणखी ५० हजार रुपये घेतले. आरोग्य विभागात नोकरीचे काम सुरू असतानाच प्रतीकने इन्कम टॅक्स विभागात आरोग्य विभागापेक्षा चांगली नोकरी आहे. तेथे वरच्या पोस्टवर नोकरी मिळवून देतो, असे सांगितले. इन्कम टॅक्स विभागाचा उल्लेख असलेले मेसेज पाठवत व्हिडीओ कॉलवर नियुक्तीपत्र दाखवून प्रतीकने अक्षयकडे दोन लाख रुपयांची मागणी केली. थोडे थोडे करून अक्षयने त्याला पैसे पोच केले. नोकरीचे नियुक्तीपत्र न पाठवता त्याने आणखी तीन लाख रुपयांची मागणी केली. पुढच्या आठवड्यात जॉयनिंग आहे. हे पैसे दिले नाही तर, सर्व पैसे बुडतील, अशी भीती त्याने अक्षयला घातली.

अक्षयने डिसेंबर २०२२ मध्ये त्याला परळ रेल्वे स्थानकात भेटून तीन लाख रुपये रोख दिले. त्यानंतर, अक्षयला ना आरोग्य विभागात नोकरी मिळाली. ना आयकर खात्यात नोकरी मिळाली. त्याने प्रतीकला दिलेले एकूण सात लाख दोन हजार ५०० रुपयेसुद्धा बुडाले. अखेर आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने अक्षयने काळाचौकी पोलीस ठाणे गाठून प्रतीकविरोधात फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# एटीएममधील पैसे चोरण्यासाठी नवीन शक्कल लढवणारी दुकली जेरबंद

**■नवी मुंबई :** एटीएममधून पैसे चोरण्यासाठी नवीन शक्कल लावणाऱ्या दोन चोरट्यांना वाशी पोलिसांनी रंगेहाथ अटक केली. अन्सार नायब अली (२४) व मोहम्मद शोएब जलील अहमद (२२) अशी या चोरट्यांची नावे असून त्यांनी एटीएम मशीनमधून पैसे बाहेर येण्याच्या एक ठिकाणी प्लास्टिकची प्लेट लावून त्यात ग्राहकांचे अडकलेले पैसे चोरी केल्याचे तपासात उघडकीस आले.

या प्रकरणात अटक केलेले दोन्ही आरोपी गोवंडीत राहण्यास असून त्यांनी गत रविवारी वाशी सेक्टर-१४ मधील एसबीआय बँकेच्या एटीएममध्ये पैसे बाहेर येण्याच्या ठिकाणी एक प्लास्टिकची प्लेट लावली होती. एखाद्या ग्राहकाने एटीएममधून पैसे काढल्यास ते पैसे बाहेर न येता, या चोरट्यांनी लावून ठेवलेल्या प्लास्टिकच्या प्लेटमध्ये अडकत होते. काही वेळानंतर हे चोरटे एटीएममध्ये येऊन त्यात अडकलेले पैसे काढून नेत होते. गत रविवारी बँकेचे मॅनेजर अरुण मिना यांना अन्सार अली व मोहम्मद शोएब जलील हे दोघे संशयित निदर्शनास आले. त्यानंतर मिना यांना, एटीएम मशिनच्या शटर असेंब्लीजवळ पैसे बाहेर येण्याच्या ठिकाणी एक प्लास्टिकची प्लेट लावल्याचे आढळले. मिना यांनी तत्काळ याबाबतची माहिती वाशी पोलिसांना दिली. त्यानंतर वाशी पोलिसांनी त्या ठिकाणी साध्या वेशात सापळा लावला.

यादरम्यान, भावेश कुमार हे या एटीएममध्ये २० हजार रुपये काढण्यासाठी गेले असताना त्यांच्या खात्यातून २० हजार रुपये कट झाल्याचा मेसेज आला, मात्र पैसे बाहेर आले नाहीत. त्यानंतर एक चोरटा बाहेर उभा राहिला, तर दुसऱ्याने एटीएममध्ये जाऊन २० हजार रुपये काढल्यानंतर पोलिसांनी त्याला व बाहेर उभ्या असलेल्या त्याच्या साथीदाराला ताब्यात घेतले.

### कुजलेल्या अवस्थेत मृतदेह सापडला

**■मुंबई :** माटुंगा, चार रस्ता परिसरात रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका टॅक्सीमध्ये बुधवारी कुजलेल्या अवस्थेत ४० वर्षीय चालकाचा मृतदेह सापडल्याची घटना घडली. अस्लम शेख असे मृत टॅक्सी चालकाचे नाव असून या घटनेची नोंद करून माटुंगा पोलीस अधिक तपास करत आहेत.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृत टॅक्सी चालक शेख वडाळा परिसरात वास्तव्यास होते. ४ मार्चला त्यांनी टॅक्सी चार रस्ता भागात रस्त्याच्या कडेला पार्क केली, त्यावेळी गाडीच्या काचा लावलेल्या होत्या, अशी माहिती सीसीटीव्ही फुटेजमधून समोर आली आहे. त्यानंतर बुधवारी सकाळी टॅक्सीमधून वास येऊ लागल्याने स्थानिकांनी याची माहिती पोलिसांना दिली. माटुंगा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला. शेख यांच्या अंगावर कुठल्याही जखमा नसून हृदयविकाराच्या झटका येऊन मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून वर्तवण्यात येत आहे.

# फेसबुकवरील मैत्री महिलेला पडली महागात

## सायबर चोरट्यांनी घातला ३ लाखांना गंडा

**■नवी मुंबई :** फेसबुकवरून एका अनोळखी व्यक्तीसोबत मैत्री करणे नवीन पनवेल भागात राहणाऱ्या एका ४४ वर्षीय महिलेला चांगलेच महागात पडले आहे. या महिलेने ज्या अनोळखी व्यक्तीसोबत फेसबुकवरून मैत्री केली, त्या व्यक्तीने या महिलेला कॅनडा येथून १० हजार डॉलर, सोन्याची चेन, आय फोन, डायमंड वॉच, लेडीज पर्सचे गिफ्ट पार्सल पाठवल्याचे सांगून हे पार्सल कस्टमच्या तावडीतून सोडवण्याच्या बहाण्याने तिला वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये ३ लाख ८ हजार रुपये पाठवण्यास भाग पाडून तिची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर गुन्हेगारांच्या टोळीविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

या घटनेतील तक्रारदार महिला प्रतीक्षा (४४) या नवीन पनवेलमध्ये कुटुंबासह राहण्यास असून त्या




एका खासगी कंपनीमध्ये कामाला आहेत. एप्रिल २०२३ मध्ये एका सायबर चोरट्याने प्रतीक्षा यांच्या फेसबुकवर मि. इलोट नावाने फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून त्यांच्यासोबत मैत्री केली होती. त्यानंतर भामट्या इलोट याने चॅटिंगद्वारे व व्हॉट्सॲपवरून बोलणे करून खास मैत्री झाल्याचे भासवले. त्यानंतर इलोट याने १० हजार डॉलर, सोन्याची चेन, आयफोन-१३, लेडीज पर्स, महागडी डायमंड असलेली वॉच पाठवल्याचे प्रतीक्षा यांना सांगितले. मात्र हे पार्सल एअरपोर्टमध्ये तपासणीदरम्यान पकडण्यात आले असून हे पार्सल सोडवण्यासाठी ४१ हजार रुपये मनी लॉडरिंग चार्जेस भरावे लागतील असे सांगितले. त्यामुळे प्रतीक्षा यांनी आपल्या खात्यातून ही रक्कम पाठवून दिली. काही दिवसांनंतर डिलिव्हरी बॉय असल्याचे भासवून दुसऱ्या सायबर चोरट्याने सदरचे पार्सल सोडवण्यासाठी प्रतीक्षा यांना आणखी मनी लॉडरिंगची रक्कम पाठवण्यास भाग पाडले. अशा पद्धतीने या सायबर चोरट्यांनी वेगवेगळी कारणे सांगून प्रतीक्षा यांच्याकडून एप्रिल ते डिसेंबर २०२३ या कालावधीत ३ लाख ८ हजार रुपये उकळले.

इतकी रक्कम पाठवल्यानंतर देखील प्रतीक्षा यांना त्यांचे पार्सल मिळाले नाही, त्यामुळे त्यांनी इलोट याने पाठवलेले पार्सल नाकारून आपली रक्कम परत देण्यास सांगितले. त्यानंतर त्याने वेगवेगळी कारणे सांगून टाळाटाळ केली. त्यानंतर आपली फसवणूक होत असल्याचे प्रतीक्षा यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर लैंगिक अत्याचार

**■नवी मुंबई :** उरणच्या मोरा परिसरात राहणाऱ्या प्रवीण पाटील नामक तरुणाने त्याच भागात राहणाऱ्या तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवले. त्यानंतर ती गरोदर राहिल्यानंतर तिच्यासोबत लग्न करण्यास नकार दिल्याचा प्रकार उघडकीस आला. मोरा पोलिसांनी या प्रकरणातील आरोपी



प्रवीण पाटील याच्या विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणातील आरोपी तरुण व तरुणी हे दोघेही मोरा परिसरात राहण्यास असून आरोपी प्रवीण पाटील याने पीडित तरुणीसोबत प्रेमसंबंध निर्माण केले होते. त्यानंतर त्याने पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अनेकवेळा जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवले. त्यामुळे पीडित तरुणी सहा महिन्यांची गरोदर राहिल्यानंतर पीडित तरुणीने प्रवीण पाटील याच्या पाठीमागे लग्न करण्यास तगादा लावला. मात्र प्रवीण पाटील याने पीडित तरुणीसोबत लग्न करण्यास नकार दिला. त्यानंतर पीडित तरुणीने मोरा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी प्रवीण पाटीलविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

# अल्पवयीन मुलीसह दोघींची वेश्याव्यवसायातून सुटका

**■ मुंबई :** काम मिळवून देण्याच्या बहाण्याने अल्पवयीन मुलीला मुंबईत आणून वेश्याव्यवसायात ढकलल्याचा धक्कादायक प्रकार अंमलबजावणी विभागाच्या अनैतिक व्यापार प्रतिबंध कक्षाने केलेल्या कारवाईत उघडकीस आला आहे. पोलिसांनी साकीनाक्यात कारवाई करून या अल्पवयीन मुलीसह आणखी एकीची सुटका केली असून वेश्या दलाल छाया ऊर्फ अम्मा देवरकी (४६) विरोधात गुन्हा दाखल केला आहे. साकीनाका मेट्रो स्थानक परिसरामध्ये छाया ऊर्फ अम्मा नावाची महिला अल्पवयीन मुलींचे सेक्स रॅकेट चालवत असल्याची माहिती अनैतिक व्यापार प्रतिबंध कक्षाला मिळाली होती. त्यानुसार, पोलीस पथकाने छापेमारी करून एका अल्पवयीन मुलीसह अन्य एकीची सुटका केली.

अल्पवयीन मुलीला काम मिळवून देण्याच्या बहाण्याने मुंबईत आणून वेश्याव्यवसायात ढकलण्यात आल्याचे पोलीस तपासात समोर आले. अखेर याप्रकरणी साकीनाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हे शाखा अधिक तपास करत आहे.

# 'शिकारी'च्या शोधात पोलीस पथके कोलकाता-काश्मीरमध्ये दाखल

## वडाळा अपहरण हत्या प्रकरण

**■मुंबई :** वडाळ्यातील १२ वर्षीय शाळकरी मुलाचे महिनाभरापूर्वी अपहरण करून शीर धडापासून वेगळे करत निर्घृणपणे हत्या केल्याच्या प्रकरणातील संशयित आरोपी बिपूल शिकारीच्या शोधासाठी पोलीस पथके काश्मीर आणि कोलकाता येथे पोहोचली आहेत. एकीकडे पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू असताना मृत मुलाच्या कुटुंबीयांनी कारवाई होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे वडाळा परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वडाळा पूर्वेकडील शांतीनगर परिसरात कुटुंबासोबत राहत असलेल्या १२ वर्षीय मुलाला आरोपी शिकारी याने २८ जानेवारीच्या रात्री हॉटेलमध्ये जेवायला नेतो, असे सांगून आपल्यासोबत नेले. त्यानंतर सोमवार, ४ मार्चला या मुलाचे कुजलेल्या अवस्थेतील धड आणि मंगळवारी शीर शांतीनगर जवळील खाडी पट्ट्यात सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. अपहरण झालेल्या मुलाचा मृतदेह दोन तुकड्यांमध्ये सापडल्याने पोलीस खडबडून जागे झाले असून आरोपीच्या शोधासाठी जंगजंग पछाडू लागले आहेत.

मूळचा कोलकाता येथील रहिवासी असलेल्या आरोपी शिकारी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल होता. गुन्ह्यात पॅरोलवर बाहेर पडल्यानंतर तो मुंबईत पळून आला होता. मात्र तो पोलिसांना सापडला नाही. त्यात या मुलाच्या हत्येनंतर गेला महिनाभर तो पोलिसांना गुंगारा देत आहे. मुलाला तृतीयपंथीयाला विकल्याचे त्याने स्थानिकांना सांगितले होते. त्यानुसार, पोलिसांनी तृतीयपंथीयांची चौकशी केली. मात्र या चौकशीमधून काही निष्पन्न झाले नाही. त्यामुळे आरोपी शिकारी याने मुलाला तृतीयपंथीयाला विकल्याचे खोटे सांगितल्याचा संशय पोलिसांना आहे.

मृत मुलाच्या मृतदेहाचे शीर कुत्रे किंवा अन्य श्वापदांनी तोडल्याचा अंदाज वर्तवण्यात येत असून शवविच्छेदन अहवालानंतर याबाबत अधिक माहिती समोर येईल, असे पोलिसांनी सांगितले.

फिरायला जातो, असे सांगून घराबाहेर पडलेला मुलगा घरी परतलाच नाही. सर्वत्र शोध घेऊनही तो न सापडल्याने मुलाच्या वडिलांनी वडाळा टीटी पोलीस ठाणे गाठून मुलगा हरवल्याची तक्रार दिली होती. तसेच मुलगा याच परिसरात राहत असलेल्या आरोपी शिकारी याच्यासोबत गेल्याचे समजल्याने स्थानिकांनी शिकारी याला पकडून चोप देत पोलिसांच्या हवाली केले होते. मात्र पोलिसांना चकवा देऊन तो पसार झाला. त्यानंतर पोलीस मुलाचा आणि आरोपी शिकारी याचा शोध घेण्यात अपयशी ठरल्याने मुलाच्या कुटुंबीयांसह स्थानिकांनी संबंधित पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार या प्रकरणाची सहाय्यक पोलीस आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# पायाने पीठ तुडवणारे दुकान बंद; अन्न व सुरक्षा प्रशासनाची कारवाई

**■ उल्हासनगर:** मिठाई विक्रीच्या दुकानातील कारागीर समोसा व कचोरीसाठी तयार करण्यात येणाऱ्या पिठाला पायाने तुडवतानाचा व्हायरल व्हिडिओमुळे चव्हाट्यावर आल्यावर गावकऱ्यांनी दुकानावर धडक देऊन दुकानातील साहित्य फेकून देण्यास भाग पाडल्याचा प्रकार सोमवारी उल्हासनगरात उघडकीस आला होता. या प्रकाराची दखल घेऊन बुधवारी अन्न व सुरक्षा प्रशासनाच्या अधिकारी अरुणा विरकायदे यांनी दुकानातील खाद्य पदार्थांचे नमुने घेतले असून दुकान बंद करण्याची नोटीस दुकानदाराला बजावली आहे. आशेळेगाव प्रवेशद्वारावर गेल्या १५ वर्षांपासून हरिओम स्वीट नावाचे दुकान आहे. या दुकानात मिठाई सोबत समोसे, कचोरी, वडापाव, ढोकला आदी खाद्यपदार्थ विक्रीसाठी असतात. जवळपास पंधरा ते वीस हजार लोकसंख्या असलेल्या गावाच्या वेशीवर हे एकमेव गोड व खाद्य पदार्थ विकणारे दुकान असल्याने अख्खे आशळेगाव या दुकानातून मिठाईची खरेदी करते. अशात दुकानातील कारागीर हा समोसे, कचोरीचे पीठ पायाने तुडवतानाचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला होता.या प्रकाराने संतप्त झालेल्या गोपी कडू, अंकुश कडू, परेश तरे, नितीन तरे, योगेश म्हात्रे, गोपाळ कडू, अशोक कडू, तात्या कारकर, मनीष तरे आदी गावकऱ्यांनी सोमवारी दुपारी हरिओम स्वीट दुकानावर धडक दिली. यावेळी दुकानदाराला जाब विचारला असता कारागिराने ही चूक केली असल्याचे मान्य केले. मात्र पायाने पीठ तुडवण्याचा प्रकार हा गंभीर असल्याने विठ्ठलवाडी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पडवळ यांनी अन्न व सुरक्षा प्रशासनाला कळवले होते. त्यानुसार अधिकारी अरुणा विरकायदे यांनी खाद्य पदार्थांचे नमुने घेऊन दुकान बंद करण्याची नोटीस दिली.

